दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १८८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.८ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रायगडात थंडीच्या दिवसात मुसळधार पाऊस ; भात पिकांचे मोठे नुकसान

## अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची उडाली तारांबळ

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

**मागील वर्षभरापासून ऋतुचक्र पूर्णपणे बदलले आहे, कधी उन्हाळ्यात पाऊस, तर कधी पावसाळ्यात कडक उन्ह तर हिवाळ्यात मुसळधार पाऊस अशी वातावरणातील परिस्थिती व हवामानबदल ऋतुचक्र बदलल्याचे संकेत देत आहे. सुधागड पाली सह जिल्ह्यात ऐन थंडीच्या दिवसात पावसाने हजेरी लावली, व हवेत प्रचंड गारवा निर्माण केला. ऐन हिवाळ्यात राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली आहे.**

थंडीच्या महिन्यात आलेल्या पावसामुळे अनेकांना स्वेटरऐवजी छत्री घेऊन बाहेर पडण्याची वेळ आली आहे.पावसाने रायगड जिल्ह्यात अचानक हजेरी लावली. या पावसाचा जोर प्रामुख्याने जिल्ह्याच्या उत्तर भागात होता. परतीच्या पाऊसधारा बरसल्यामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन उष्म्याने हैराण झालेल्या जनतेला दिलासा मिळाला, मात्र पोटरीला आलेले भातपीक आणि त्याचबरोबर फुलोरा धरण्याच्या अवस्थेत असलेल्या भातपिकाला काही प्रमाणात फटका बसण्याची शक्यता शेतकर्यांकडून व्यक्त होत आहे.

तर काही शेतकर्यांनी तयार झालेल्या भातपिकाची कापणी केली असल्याने ते भिजून गेले आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळत होतं. हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका शेतकरी वर्गाला बसतोय, कधी वादळे, कधी अवकाळी पाऊस, कधी अतिवृष्टी तर कधी परतीचा पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास गळून पडतो. भातशेतीचे उत्पादनात घट झालीच, मात्र अशीच परिस्थिती राहिली तर कडधान्य, वाल आदी पिके देखील अवकाळी पावसाने अडचणीत येणार आहेत.

**नैसर्गिक व आस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारची मदत देखील तुटपुंजी मिळते तर कधी त्याच्या पदरी निराशाच येत असते. सरकारने शेती व शेतकरी वाचवण्यासाठी आवश्यक ते धोरण राबविले पाहिजे, कारण शेतकरी जगला तरच देश जगेल अशी जगमान्य परिस्थिती सरकारने जाणली पाहिजे. व शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे अशी मागणी जोर धरत आहे.**



# विनयभंग प्रकरणी रावे येथील एकास अटक

## आरोपीस ११ ऑक्टोबर पर्यंत न्यायालयीन कोठडी

**दै.रायगड नगरी । पेण**

**पेण तालुक्यातील रावे गावातील ७ वर्षीय मुलगी दांडिया निमित्त होममिनिस्टर बघण्यासाठी गावात गेली असता त्याच गावातील रमेश मारुती पाटील रा.रावे याने विनयभंग केल्या प्रकरणी दादर सागरी पोलीस स्टेशनला पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीस अलिबाग सत्र न्यायालयात हजर केला असता ११ ऑक्टोबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.**

घटनेचे सविस्तर वृत्त असे की, रावे गावातील रायबादेवीच्या प्रांगणात नवरात्रोत्सवानिमित्त होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम पाहण्यासाठी याच गावातील ७ वर्षीय मुलगी तिच्या आई व बहिणीसोबत गेली असता तिथे उपस्थित असलेल्या रमेश मारुती पाटील रा.रावे यांनी सदर मुलीला मांडीवर घेऊन गर्दीचा फायदा उचलत बाजूला जाऊन अंगलट करण्याचा प्रयत्न केला. बऱ्याचवेळाने जेवणाची वेळ झाल्याने आई मुलीला शोधत गेली असता रमेश पाटील हा आड बाजूला आपल्या मुलीबरोबर अंगलट करत असल्याचे तिच्या निदर्शनास आले. यावेळी आईने आपल्या मुलीला तात्काळ खेचून जवळ घेतली. बोंबाबोंब होण्या अगोदरच सदर आरोपी रमेश मारुती पाटील आपले कपडे व्यवस्थित करून तेथून पळ काढला. मुलीच्या आईने सदर घडलेला प्रकार आपल्या नातेवाईकांना सांगून दादर सागरी पोलीस स्टेशनला येऊन तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी रमेश मारुती पाटील या आरोपीवर भादवी कलम ३५४, पोक्सो अंतर्गत बालकाचे लैगिक अत्याचारापासून संरक्षण अधि.८,१२ नुसार गुन्हा दाखल करत अटक करून अलिबाग न्यायालयात हजर केले असता ११ ऑक्टोबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. अधिक तपास दादर सागरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक के.आर.भऊड हे करीत आहेत.

# एकनाथ शिंदेंनी पक्षच सोडला, मग शिवसेनेच्या चिन्हावर दावा कसा

## निवडणूक आयोगामध्ये उद्धव ठाकरे गटाची भूमिका

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे निवडणूक चिन्ह असलेल्या धनुष्य-बाणाची लढाई सध्या निवडणूक आयोगाच्या कोर्टात आहे. आज एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून निवडणूक आयोगात चिन्हासाठी दावा करण्याचा शेवटचा दिवस होता. यावेळी उद्धव ठाकरे यांनी चिन्हावर दावा ठोकत, आपल्याच गटाचा या चिन्हावर (धनुष्य-बाणावर) अधिकार असल्याचे म्हटले आहे.

यावेळी, आपली बाजू मांडताना उद्धव ठाकरे गटाने आयोगासमोर तर्क ठेवला, की एकनाथ शिंदे आणि त्यांचे समर्थन करणाऱ्या नेत्यांनी स्वतःच पक्ष सोडला आहे. यामुळे शिवसेनेच्या पक्ष चिन्हावर त्यांचा कसलाही दावा असू शकत नाही. कारण ते पक्षातूनच बाहेर गेले आहेत. एकनाथ शिंदे यांनी गेल्या जून महिन्यात शिवसेनेत बंडाचे निशाण फडकावले आणि महाराष्ट्र मुख्यमंत्री झाले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या एकूण ५५ आमदारांपैकी तब्बल ४० आमदारांसह बंडाचा झेंडा उंचावला होता. एवढेच नाही, तर यानंतर त्यांना तब्बल एक डझन खासदारांचे समर्थनही मिळाले. तेव्हापासूनच उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात पक्षाच्या दावेदारीवरून संघर्ष सुरू आहे. मात्र, सध्या तांत्रिकदृष्ट्या उद्धव ठाकरे हेच शिवसेना पक्षप्रमुख आहेत.

तर दुसऱ्या बाजूला, आपल्यासोबत अधिक नेते आहेत, यामुळे आपला गटच खरी शिवसेना आहे, असे एकनाथ शिंदे यांचे म्हणणे आहे. यावेळी दसऱ्याच्या निमित्ताने दोन्ही गटांकडून स्वतंत्र मेळावा घेण्यात आला. विशेष म्हणजे, पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांच्या सभेसाठी जवळपास दोन लाख लोक एकत्र आले होते. तर शिवाजी पार्कमध्ये एक लाख कार्यकर्ते जमले होते.

# खरवली ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी चौरंगी तर सदस्यांसाठी दुरंगी तिरंगी लढत

**दै.रायगड नगरी । महाड**

तालुक्यातील एकमेव खरवली काळीज ग्राम पंचायतीसाठी १६ आक्टोबर रोजी निवडणुक होत असून या निवडणुकीत सरपंच पदासाठी चौरंगी तर सदस्य पदाकरीता दुरंगी व तिरंगी लढत होणार आहे.

गेली अनेक वर्षे शिवसेनेच्या ताब्यात असलेली ही ग्राम पंचायत राज्यातील शिव-सेनेत पडलेल्या फुटी नंतर आपल्याच ताब्यात ठेवण्याचे आव्हान आ. भरतशेठ गोगावले व त्यांच्या समर्थक यांना असणार आहे. खरवली ग्राम पंचायतीच्या सरपंच पदासाठी शिवसेनेकडून समीर राजाराम म्हामुणकर, कॉंग्रेस आघाडी कडून चैतन्य प्रकाश म्हामुणकर, भाजपकडून दुर्गेश प्रकाश पवार तर वंचित बहुजन आघाडी कडून सखाराम राया सकपाळ असे उमेदवार आपले नशिब आजमावणार आहेत.

सदस्य पदासाठी प्रभाग क्र. १ अ मधून दिनेश गणपत भोसले, मनोहर महादेव खटावकर, प्रभाग क्र. १ ब मधून नेहा नितेश सकपाळ, मनाली मनोज काळीजकर अशी दुरंगी लढत होणार आहे. प्रभाग क्र.२ अ मधून प्रफुल्ल वाघरे, रविंद्र नलावडे, संतोष सोनावणे, प्रभाग क्र. २ ब मधून अनिता सकपाळ, जागृती महाडीक, रेखा सकपाळ, साधना पवार, स्नेहा पवार अशी तिरंगी व पंचरंगी लढत होणार आहे. प्रभाग क्र. ३ अ मधून रविंद्र विठ्ठल



घोलप, रोहीदास गंगाराम जाधव प्रभाग क्र. ३ ब मधून निकीता राम सावंत, प्रियंका प्रितम म्हामुणकर, शिल्पा विश्वनाथ राखाडे, स्मिता सुभाष गायकवाड यांच्या मध्ये दुरंगी व चौरंगी लढत होणार आहे. प्रभाग क्र. ४ अ मधून दिपक राजेश शिर्के, संदेश केशव सोनावणे, प्रभाग क्र. ४ ब मधून नितेश वामन काटेकर, योगेश विष्णू वाघे, हरिश्चंद्र पवार, प्रभाग क्र. ४ क मधून अनिशा म्हामुणकर, आरती म्हामुणकर, वनिता पवार अशी दुरंगी व तिरंगी लढत होणार आहे. प्रभाग क्र.५ अ योगेश मधुकर शेडगे, वनिता हरिश्चंद्र पवार, विश्वनाथ राखाडे, प्रभाग क्र. ५ ब मधून रिया रविंद्र घोलप, स्मिता संदेश वाडेकर, श्रृतिका अमोल म्हस्के यांच्यात तिरंगी लढत होणार आहे.

# कर्जत-पनवेल नवीन रेल्वे लाईनसाठी पादचारी पुलाचा काही भाग पाडला

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानकात काही वर्षांपूर्वी बांधलेला कमी उंचीचा असलेला पादचारी काही तांत्रिक कामानिमित्त पाडून त्याजागेवर थोडा उंच व रुंद असा पादचारी पूल दहा - बारा वर्षांपूर्वी उभारण्यात आला होता. त्या पुलाचा काही भाग कर्जत - पनवेल नवीन रेल्वे लाईन टाकण्यासाठी पाडण्यात आला.

कर्जत रेल्वे स्थानक हे मध्य रेल्वे वरील महत्व-ाचे स्थानक आहे. मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाडया येथे डबल इंजिन लावण्यासाठी थांबत असतात. आता कर्जत - पनवेल साठी नवीन रेल्वे लाईन टाकण्याचे काम सुरू झाले आहे. सुरुव-ातीपासून कर्जत रेल्वे स्थानकात जुना पादचारी पूल होता. मध्यंतरीच्या काळात डी सी, ए सी च्या तांत्रिक कामामुळे तो पूल पाडण्यात आला व त्याच जागेवर उंच व रुंद असा पूल उभारण्यात आला होता. हा पूल भिसेगाव कडील जुन्या एसटी स्टँडच्या बाजूला उतरविण्यात आला होता.

या पुलामुळे कर्जत - पनवेल साठी नवीन रेल्वे लाईन टाकण्याच्या कामी अडचण येत होती. म्हणून जुन्या एस टी स्टँड कडे उतरविण्यात आलेला. फलाट क्रमांक तीन वरील भाग काढण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे प्रवाशांच्या सेवेसाठी या पुलाला जोडून एक नवीन पूल बांधून दक्षिणेकडून पश्चिमेकडे उतरवण्यात आला आहे. त्यामुळे आज सकाळी अकरा ते दोन या दरम्यान ब्लॉक घेऊन तो अडचणीचा ठरणारा भाग तोडण्यात येणार होता. त्यासाठी पहाटेच्या सुमारासच एक मोठी क्रेन पूला जवळ आणण्यात आली होती. पूल तोडण्याचे काम अकरा ते एक वाजून चाळीस मिनिटांपर्यंत चालले. यावेळी सुमारे सतरा कर्मचाऱ्यांनी हे काम केले. कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक अनिल वर्मा आपल्या जवनांसह घटनास्थळी सकाळी साडे नऊ वाजल्यापासून उपस्थित होते. पादचारी पुलाचा अडचणीचा भाग पडल्याने आता नवीन रेल्वे लाईन टाकण्याचे काम सुरू होईल.



# खारघरमध्ये रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांची अज्ञातांकडून कत्तल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर ३५ ई मध्ये रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांची अज्ञातांकडून कत्तल करण्यात आली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी विज्ञान-तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभागाचे जिल्हा अध्यक्ष मुसादीफ मोडक यांनी पालिका अधिकाऱ्यांकडे केली आहे.

पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याने प्रशासकीय पातळीवर विविध उपाय केले जात आहेत. राज्य शास-नातर्फे झाडे लावण्याच्या मोहिमा राबवण्यात येत आहेत. असे असताना सेक्टर ३५ ई, प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स सोसायटीसमोरील रस्त्याच्या कडेला असलेल्या चार ते पाच मोठ्या झाडांची अज्ञातांकडून कत्तल करण्यात आली आहे. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींमधून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पालिका आणि सिडकोने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, रस्त्याच्या कडेला असलेली दुकाने ग्राहकांना दिसावीत, म्हणून ही झाडे तोडण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

**खारघर सेक्टर ३५ मधील पदप-थावरील झाडांची छाटणी केली आहे. कोणतेही झाड तोडण्यापूर्वी पालिकेकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी नसताना झाडे तोडली असतील, तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.**
**- कैलास गावडे,**
**(उपायुक्त, पनवेल महापालिका)**

# स्वच्छ सर्वेक्षणात पनवेल महानगरपालिका राज्यात पाचवी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ स्पर्धेमध्ये आयुक्त तथा प्रशासक श्री. गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते १० लाख लोकसंख्येच्या गटामध्ये राज्य पातळीवर ३४ शहरांमध्ये पनवेल महानगरपालिकेला ५ वा क्रमांक प्राप्त झालेला आहे. तसेच देशपातळीवर ३८२ शहरांमध्ये १७ वा क्रमांक प्राप्त झालेला आहे. याचबरोबर कचरामुक्त शहरांसाठीचे ३ स्टार व हागणदारी मुक्त शहराचा ODF++ दर्जा प्राप्त आहे. महापालिका स्थापनेपासून उत्तोरोत्तर प्रगती करत यावर्षी सर्वोत्तम क्रमांक प्राप्त केला आहे.**




स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये पनवेल महानगरपालिकेने अत्यंत उत्साहाने सहभागी होत यावर्षी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या. आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या निर्देशानुसार स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे संदेश प्रसारित करणारी चित्रे भिंतीवर काढण्यात आली होती तसेच तलावांची स्वच्छता करण्यात आली होती. विविध टाकाऊ वस्तूंचे रिड्युस, रियुझ, रिसायकलचा प्रचार व प्रसार करण्याकरिता प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. तसेच टाकाऊ वस्तुंपासून तयार केलेल्या विविध शोभेच्या वस्तूंपासून चौक, कोपरे सुशोभित करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत अभियान स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत चित्रकला, पोस्टर जिंगल,गाणी, व्हिडीओ, शॉर्ट फिल्म, पथनाट्य, भिंतीचित्र स्पर्धांचे आयोजन केले होते. तसेच स्वच्छ सोसायटी, स्वच्छ हॉटेल, स्वच्छ महाविद्यालय-शाळा, स्वच्छ प्रशासकीय कार्यालये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फुर्त सहभाग घेऊन स्वच्छता विषयक जनजागृतीमध्ये आपला सहभाग नोंदवला.

यापुढेही स्वच्छ सर्वेक्षणामध्ये महापालिकेची प्रगती करण्याच्या दृष्टीने नागरिकांनी महापालिका क्षेत्र कचरा मुक्त राहावे यासाठी शासनाने सांगितलेल्या नियमांचे पालन करावे असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

महापालिकेच्यावतीने घनकचरा व्यवस्थापन विषयक विविध उपक्रम राबविले गेले. त्यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने नागरिकांना त्यांच्या विविध सभा, समारंभ थ्री आर संकल्पनेनुसार साजरे करण्याचे आवाहन आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी केले आहे. त्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. विविध सायट्यांमध्ये कचरा विलगीकरणाचे महत्व सांगून कंपोस्ट खत तयार करण्याच्या कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या.

पनवेल महानगरपालिकेच्या लोकप्रतिनीधी, स्वच्छता विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या बरोबर, स्वच्छता निरीक्षक, कर्मचारीवृंदाने व स्वच्छता मित्रांनी केलेले स्वच्छताविषयक काम आणि त्याला नागरिकांचा लाभलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळेच पनवेल महानगरपालिकेस स्वच्छतेचा हा बहुमान प्राप्त झालेला आहे.

# कंटाळवाणा कलगीतुरा

विजयादशमीच्या मुहूर्तावर महाराष्ट्रात आपट्याच्या पानांच्या सोन्यापेक्षा विचारांचे सोनेच अधिक लुटले जाऊ लागले आहे. यंदा करोनाच्या खंडानंतर महाराष्ट्राच्या वैचारिक सुवर्ण लुटीमध्ये आणखी भर पडली. म्हणजे, म्हटले तर सकाळी विदर्भात नागपूरचे भाषण, त्यानंतर मराठवाड्यातला भगवान गडावरचा मेळावा आणि नंतर मुंबईचा. यंदा मुंबईत शिवसेनेचे दोन मेळावे झाल्याने मराठी माणसाच्या वैचारिक श्रीमंतीत आणखी भर पडली. 'आमचीच शिवसेना खरी' या एका दाव्यासाठी शिवतीर्थ आणि बीकेसीचे मैदान येथे जास्तीत जास्त श्रोते जमविण्याची जी आसुरी स्पर्धा गेला महिनाभर चालू होती; तिचा समारोप एकमेकांवर चिखलफेक, पुन्हा पुन्हा तेच आरोप आणि कंठाळी पद्धतीने दिलेली आव्हाने यांनी झाला. या कंटाळवाण्या कलगीतुऱ्यात महाराष्ट्राच्या हिताचा, महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणाचा विचार किंवा काही कृती कार्यक्रम तोंडी लावण्यापुरता होता. यात पारडे कुणाचे जड झाले किंवा कुणी कुणाला मात दिली; याचेही निष्कर्ष महाराष्ट्राच्या हिताचा निकष न लावता 'आपला कल कुणाकडे आहे' याला कौल लावून काढले जात आहेत. कुणाची तरी बाजू घेतल्याशिवाय आपल्या वैचारिक संपदेचे सार्थकच होणार नाही, असा भ्रम काही माध्यमांसहित बहुतेक बुद्धिजीवी तसेच समाज माध्यमवीरांना झाला आहे. शिवसेनेत मोठी फूट पडल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जिद्दीने शिवतीर्थावर इतका मोठा मेळावा घेतला, हे विशेष आहे. मात्र, एवढे मोठे मेळावे वक्त्यांच्या जिभेवर नाचणाऱ्या सरस्वतीपेक्षा नेत्यांच्या खिशातल्या 'लक्ष्मी'मुळे अधिक प्रसन्न दिसतात, हे वेगळे सांगायला नको. दोन्ही मेळाव्यांसाठी नोंदणी केलेल्या गाड्यांची संख्या, जेवणा-खाण्याची व्यवस्था आणि इतर सोयी यांची आकडेवारी चकित करणारी नव्हे; तर शिसारी आणणारी होती. गाळात चाललेल्या एसटी महामंडळाला तात्पुरता आधार आणि अनेक बेरोजगार तरुणांना दोन दिवसांची सफर या पलीकडे या हजारो लोकांचे असे काय मोठे वैचारिक उद्बोधन या मेळाव्यांनी केले? शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय; या दोघांच्याही भाषणात अवाक्षरही नवे नव्हते. नवे सरकार येऊन आता शंभर दिवस झाले. किती दिवस दोन्हीकडचे नेते तेच तेच बोलून महाराष्ट्राचा अंत पाहणार आहेत? मुख्यमंत्र्यांचे भाषण शिवाजी पार्कवर ठाकरे काय बोलतात, याचा अंदाज घेत चालले होते की काय, कळत नाही. ठाकरे यांच्या टीकेला उत्तर देण्याच्या भानगडीत मुख्यमंत्र्यांचे भाषण विस्कळित होत गेले. बरे, तेही तिकडे काही नवीन बोलत नव्हतेच. इरेला पडून इतकी माणसे आपण कशासाठी जमा केली आहेत आणि जाताना आपण त्यांना महाराष्ट्राच्या हिताचा काही ठोस कार्यक्रम किंवा एखादा तरी नवा विचार देऊ शकलो का, याचे आत्मपरीक्षण या दोन्ही नेत्यांनी करायला हवे. महापालिकांच्या निवडणुका जवळ येत आहेत. तेथे मतदारांकडे जाताना 'शिवसेना' या ऐतिहासिक शब्दाचा आणि 'धनुष्यबाण' या चिन्हाचा वारसा कुणाकडे येतो; याची ही लढाई आहे. मात्र, त्या लढाईचे रणांगण निवडणूक आयोग आहे. सर्वोच्च न्यायालयाने ते स्पष्ट केले आहे. माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्या मते हा निकाल तडकाफडकी लागणारा नाही. त्याला कित्येक महिनेही लागू शकतात. दरम्यान निवडणुका आल्याच तर चिन्ह गोठवलेही जाऊ शकते. त्यामुळे, अंधेरी पूर्व मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीत या चिन्हाचे काय होते, हे लवकरच समजेल. तेव्हा, मेळाव्यांच्या व्यासपीठावर निवडणूक चिन्ह्यांच्या कितीही मोठ्या प्रतिकृती दोघांनीही बनविल्या, तरी त्याला मर्यादितच अर्थ आहे. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतरच्या महाराष्ट्राच्या वाटचालीत शिवसेनेचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जाग्या झालेल्या मराठी अस्मितेला शिवसेनेच्या रूपाने नवा अवतार मिळाला. पुढे या अस्मितेवर हिंदुत्वाचे कलम झाले. हिंदुत्वाचा ठेका सध्या कुणाकडे आहे, हे साऱ्यांना माहीत आहे. अशावेळी, आमचे हिंदुत्व खरे की तुमचे? या जाहीर वितंडाला काही अर्थ नव्हता. आज परप्रकाशित व परावलंबी होऊन बसलेल्या दोन फुटीर गटांच्या भांडणापेक्षा महाराष्ट्राच्या हिताचा किंवा कल्याणाचा अजेंडा पुढे जातो की नाही, हे अधिक महत्त्वाचे आहे. या दृष्टीने काही भविष्यवेधी, नवी मांडणी करण्याची संधी विजयादशमीच्या मेळाव्याच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोघांनाही होती. ती या दोघांनीही वाया घालवली आणि सुमार भाषाशैलीत तसेच बालीश शाब्दिक कोट्या करीत परस्परांची उणीदुणी काढण्यातच त्यांनी धन्यता मानली. सत्तास्पर्धेला किमान तात्त्विक मुलामा देण्याएवढी सफाईदेखील दोघांच्या भाषणात नव्हती. महाराष्ट्रात काही दिवसांनी निवडणुकांचे पर्व सुरू होईल. तेव्हा तरी प्रचार करताना नवे विचार, नवी भाषा यावी. या दोन्ही 'यशस्वी आणि भव्य' महामेळाव्यांच्या निमित्ताने झालेला हा कलगीतुरा आता अखेरचा ठरावा.

# महेंद्र घरत यांच्या हस्ते प्राथमिक शाळा कळंबूसरे येथे भूमिपूजन संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी यांच्या जिल्हा नियोजन निधीतून उभारण्यात येत असलेल्या कळंबूसरे प्राथमिक शाळेच्या इमारतीचा भूमिपूजन समारंभ रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, तथा कामगारांचे नेते महेंद्र शेठ घरत यांच्या शुभहस्ते पार पडला.



उरण तालुक्यातील कळंबूसरे हे एक छोटसं गाव असून या गावातील प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्यांची दुरवस्था झाली होती.त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यकता असल्या कारणाने रायगड जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी यांच्या जिल्हा परिषद निधीतून हे काम मंजूर करण्यात आले आहे.सदर कामाचा भूमिपूजन समारंभ रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र शेठ घरत यांच्या हस्ते नुकताच पार पडला आहे.यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, रायगड जिल्हा ओबीसील अध्यक्ष उमेश भोईर, उरण तालुका युवक इंटक अध्यक्ष राजेंद्र भगत, कुलदीप नाईक, भालचंद्र पाटील, विकी पाटील , रामदास जाधव, संतोष राऊत, रणजीत पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका, सुदर्शन जाधव, ऋषिकेश भेंडे व ताराबाई नाईक, सुरेश भेंडे सह गावकरी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये मॅरेथॉनला पंधरा हजारांपेक्षा जास्त सहभाग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विशाल प्रजापती राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण व रायगड अथलेटिक्स स्पोर्ट्स क्लबचे संचालक यांच्यावतीने कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये नुकताच बिंग स्ट्राँग पनवेल मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पंधरा हजारांपेक्षा जास्त स्पर्धेकांनी सहभाग घेत 'हम फिट है' असा एक प्रकारे संदेश दिला. ही मॅरेथॉन पाहण्याकरीता मोठया प्रमाणात गर्दी करण्यात आली होती.

राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण व रायगड अथलेटिक्स स्पोर्ट्स क्लबचे संचालक विशाल प्रजापती यांच्या वतीने कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे बिंग स्ट्राँग पनवेल मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उत्तम नियोजन आणि मोठया संख्येने उपस्थितीती हे या मॅरेथॉनचे वैशिष्ट्य पाहायला मिळाले. फिटनेसचा संदेश देत मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, कर्नाळा स्पोर्ट्स अध्यक्ष मुकुंद म्हात्रे, अध्यक्ष एस.के.नाईक, रायगड जिल्हा ऍथलेटिक असो. अध्यक्ष प्रवीण खुटारकर, अमिस मोमया, शशिकांत शर्मा, शमा हंटगडी, हे उपस्थित होते त्याचबरोबर अमीस निरंजन मोमाया इंडियन ऑइल सर्वे व जेके टायर व एनर्जी ड्रिंक प्रेडेटर गोल्ड स्ट्रिके यांनी मदत केली होती. एनसीसी सपोर्ट एम पी एस सी कॉलेज पनवेल श्री कॅप्टन आर एस जमनुके यांनी मदत केली होती. याचबरोबर या मॅरेथॉन आयोजक म्हणून कल्पेश मंगेश कामडी, श्रीदेवी, शिवाजी तराळ, विशाल प्रजापती हे आयोजक म्ह्णून कार्यक्रमाचे नियोजन उत्तम करण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये हम भी फिट' असल्याचे जणु काही सांगत होते.



## स्टार्टअप व नाविन्यता यात्रेत नवकल्पनांचे सादरीकरण करण्याकरिता...

# नवउद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडून स्टार्टअप व नाविन्यता यात्रेचा प्रारंभ दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी विभागस्तरावर करण्यात आला आहे.

नागरिकांनी www.msins.in किंवा www.mahastartupyatra.in या संकेतस्थळावर आपली नाविन्यपूर्ण नवकल्पना नोंदवावी, स्टार्टअप व नाविन्यता यात्रेत नवकल्पनांचे सादरीकरण करण्याकरिता जिल्ह्यातील नवउद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे. तसेच स्टार्ट अपच्या नवकल्पना सुचवा आणि बक्षीस मिळवा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त श्रीमती अ.मु.पवार यांनीही केले आहे.

नोंदणीकृत नवकल्पनांचे सादरीकरण करण्याकरिता दि.१३ ऑक्टोबर २०२२ रोजी माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथे एकदिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येणार आहे. यात पहिल्या सत्रामध्ये सकाळी ९.३० वाजता विभागाच्या विविध योजनांची माहिती, स्टार्टअपच्या प्रवासातील टप्पे याबाबत मार्गदर्शन व स्थानिक उद्योजकांची व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत. दुसऱ्या सत्रात दुपारी ११.३० वाजता सादरीकरणाची संधी देण्यात येईल. नोंदणी केलेल्या उमेदवार/ उद्योजकांनी सादरीकरणाचे वेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

या सादरीकरण सत्रामध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, शाश्वत विकास (कचरा व्यवस्थापन,स्वच्छ पाणी,उर्जा इ.), ई-प्रशासन, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि गतिशीलता, यासारख्या महत्वाच्या तसेच इतर कुठल्याही लोकोपयोगी क्षेत्रातील समस्यांवरील आपल्याकडे असलेला नाविन्यपूर्ण उपाय मांडणे आवश्यक आहे. यातून प्रत्येक जिल्ह्यामधून अव्वल ३ विजेते घोषित केले जातील.

नाविन्यपूर्ण कल्पना व उद्योग सादरीकरण करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांनी व उद्योजकांनी आपल्या नवकल्पना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या संकेतस्थळावर भेट देवून नोंदवावी.

अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग फोन नं. ०२१४१-२२२०२९ नंबरवर संपर्क साधावा आणि या स्टार्टअप यात्रेकरिता कोणतीही वयाची अट नसल्याने रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजक, विद्यार्थी व नाविन्यता परिसंस्था यांनी सहभाग घेऊन या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती अ.मु. पवार यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त स्टार्टअप व नवकल्पनांची नोंदणी होण्यासाठी तालुकास्तरावर स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून दि.२६ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२२ दरम्यान जनजागृती व प्रसिद्धी करण्यात आली असून या यात्रेच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात फिरत्या एलईडी डीस्प्ले व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात आली.

सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हास्तरीय पहिल्या क्रमांकास २५ हजार रुपये, दुसऱ्या क्रमांकास १५ हजार रुपये, तर तिसऱ्या क्रमांकास १० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे.

कृषी, शिक्षण, आरोग्य, सस्टेनिबिलिटी (कचरा व्यवस्थापन, पाणी, स्वच्छता, ऊर्जा इत्यादी, ई-प्रशासन, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि गतिशीलता अशा विविध क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट नवकल्पना सादर केलेल्या राज्यस्तरीय विजेत्यांना पहिल्या क्रमांकास १ लाख रुपये, तर द्वितीय क्रमांकास ७५ हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वरील नमूद क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट महिला उद्योजकांसाठी १ लाख रुपयांचे विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय सादरीकरणातून सर्वोत्तम तीन कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण होणार असून त्यातून निवडलेल्या राज्यस्तरीय विजेत्यांना रोख अनुदान तसेच इनक्युबेशन सहाय्य, बीज भांडवल/निधीसाठी सहाय्य, नाविन्यता परिसंस्थेतील महत्वाच्या संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शक सत्रे तसेच सॉफ्टवेअर क्रेडिट्स, क्लाऊड क्रेडिट्स सारखे इतर लाभही पुरविण्यात येणार आहेत.

# वादळी हवामानामुळे चांगला सुरू झालेला मासेमारीचा हंगाम पुन्हा मंदावण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील पंधरा दिवसांपासून समुद्र शांत झाल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारा, त्याचप्रमाणे अरबी समुद्रात मच्छीमारी हंगामाला चांगल्या प्रमाणात सुरवात झाली होती. या हंगामात मच्छीमारांना कोळंबी, पापलेट, सुरमई, बांगडा, बीलीज, मांदेली, बगी त्याचप्रमाणे इतर विविध प्रकारची बारीक मच्छी मोठ्या प्रमाणावरती मिळत होती. परंतु काल पासून परतीचा पाऊस सुरू झाल्यानंतर पुन्हा एकदा वातावरणात बदल झाला आहे. त्यामुळे काल सायंकाळ पर्यंत समुद्रात मासेमारी करणाऱ्या नौका आज सकाळपासून अजिबात पाहायला मिळत नाहीयेत. येत्या काही दिवसांमध्ये अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जवळजवळ १६ ऑक्टोबर च्या आस पास चक्रीवादळ निर्माण होते की काय अशी परिस्थिती विंडी ॲप वरती दिसत आहे. नारळी पौर्णिमा झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मच्छीमारीचा हंगाम सुरू होतो. परंतु या वर्षी नारळीपौर्णिमा झाल्यानंतर जोरदार वादळी वाऱ्यामुळे मच्छीमारीचा हंगाम सुरू झाला नाही. पर्यायाने मच्छिमारांना नुकसान सोसावे लागले. पितृपंधरवडा संपता संपता हवामान मासेमारीसाठी अनुकूल झाले. काही दिवस मासेमारी करण्यात देखील आली. त्यामध्ये मच्छीमारांना बर्यापैकी मासळी प्राप्त देखील झाली. परंतु पुन्हा एकदा हवामानामध्ये बदल झाल्यामुळे मच्छीमारां मध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र हवामान बदलाविषयी राज्याच्या हवामान खात्याकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

# श्रीवर्धन तालुक्यात परतीच्या पावसाचा जोरदार दणका

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

काल दुपारी दोन वाजेपर्यंत श्रीवर्धन परिसरात लख्ख ऊन पडले होते. हवेत उष्म्याचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणात वाढले होते. अंगातुन घामाच्या धारा निघत होत्या. अशातच दुपारी अडीच वाजता अचानक आभाळ भरुन आले व मेघगर्जनेसह जोरदार पावसाला सुरुवात झाली. अर्धा ते पाऊण तास पडलेल्या पावसाने आटलेल्या नदी,नाल्यांना भरपूर पाणी आले. तर श्रीवर्धन शहरातील आटलेली गटारे पुन्हा वाहू लागली. मात्र जोरदार पाऊस पडल्यामुळे उष्म्याने त्रस्त नागरिकांना गारव्यामुळे दिलासा मिळाला. आजही पहाटे साडेतीन वाजल्यापासून सकाळी आठ वाजेपर्यंत जोरदार पाऊस पडत होता. त्यानंतर पावसाचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले. परंतु ढगाळ वातावरण असून केव्हाही पाऊस पडेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. नवरात्र सुरु झाल्यावर सर्वसाधारण भात शेती पसवण्यास सुरुवात होते. यावेळी भाताच्या रोपांना नवीन दाणे येत असतात. नवीन दाणे आल्यानंतर भाताच्या काड्या काही प्रमाणात सुकू लागतात. परंतु जोरदार पाऊस आल्यानंतर हे भात पूर्णपणे शेतामध्ये पडून जाते व शेतामध्ये तुंबलेल्या पाण्यामध्ये भारताच्या दाण्यांना मोड येतात. काल झालेला जोरदार पाऊस व वादळी वारा यामुळे अनेक ठिकाणी शेतामध्ये भात पडल्याचे दिसून आले. दांडिया रसिकांना नऊ दिवस पावसाने चांगल्याप्रकारे दांडिया खेळून दिला. परंतु दसरा झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी परतीच्या पावसाने जोरदार दणका दिला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील पाच ते सहा दिवस अशीच परिस्थिती राहील. असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सप्टेंबर महिन्याच्या २७ तारखेला पावसाळ्यातील शेवटचे हस्त नक्षत्रात निघाले होते. मात्र हस्त नक्षत्राचे सुरुवातीचे आठ ते दहा दिवस कोरडेच गेले. परंतु १० ऑक्टोबर रोजी चित्रा नक्षत्र सुरू होत असून या नक्षत्राला वाहन उंदीर आहे. त्यामुळे या नक्षत्रात पाऊस पडण्याचा अंदाज जवळ जवळ नाहीच. परतीच्या पावसाने अचानक दणका दिल्यामुळे पर्यटन व्यवसायावर देखील त्याचा परिणाम झाला. अनेक ठिकाणी पर्यटकांनी केलेले बुकिंग जोरदार पावसामुळे रद्द देखील करण्याचे प्रकार घडले आहेत. चार महिने आपला धंदा बंद करून बसलेल्या पर्यटन व्यावसायिकांना आता तरी धंदा सुरू होईल अशी आशा होती. परंतु परतीच्या पावसाने त्यांच्या आशेवरती पाणी फिरवले आहे. मात्र दिवाळीपासून पर्यटनाचा हंगाम चांगल्याप्रकारे सुरू होईल असा अंदाज पर्यटन व्यावसायिकांमध्ये वर्तविला जात आहे.

# माणगांवात जिवा महाले जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भव्य मिरवणूक व साहसी खेळांचे प्रात्यक्षिक होणार

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नाभिक समाज संघटनेतर्फे माणगांवात प्रथमच शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जन्मोत्सव सोहळ्या निमित्त रविवार दि.९ ऑक्टोबर रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. माणगांव येथील नाभिक समाजाचे भाऊ पांडे यांचे निवासस्थान (सौरभ हॉटेल) येथे दुपारी ०१.०० वाजता, शिवरत्न जिवाजी महाले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दु. ०२.०० वाजता येथुनच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती माणगांव नाभिक समाज शहर संघटनेच्या युवा कार्यकर्त्यांनी दिली आहे.

अशाप्रकारे पहिल्यांदाच नाभिक समाजाच्या वतीने बहुजन समाजातील आबाल-वृध्द, महिला-पुरुष सर्वांसाठी शिवरत्न जिवाजी महाले यांचे स्मरण, इतिहास आणि शौर्याबाबत जनजागृतीपर माहीती तसेच त्यांना विनम्र अभिवादन करण्याचे हेतुने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाज संघटनेचे सर्व युवा कार्यकर्ते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत. त्यांनी समस्त माणगांवकरांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. ऐतिहासिक काळी युध्द कौशल्याचे बाळकडु ज्या प्रशिक्षणातुन दिले जायचे, तसेच त्याकाळी वापरात येणारी शस्त्र, दांडपट्टा, तलवारबाजी, काठी फिरविणे या साहसी खेळांचे प्रात्यक्षिकही या कार्यक्रमाचे निमीत्ताने रायगडच्या खोऱ्यातील बिरवाडी गावचे तरबेज युवा मित्रमंडळातर्फे करण्यात येणार आहे. जीवा महाले हे नाव आपल्या समोर येताच हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत श्रीमंत योगी छत्रपती शिवराय आणि अफजल खानाचा वध या प्रसंगाने, इतिहास जागा होतो.

शिवरायांनी अफजल खानाचा वध करते वेळी त्यांचे अतिविश्वासु आणि जवळचे अंगरक्षक शिवरत्न वीर जीवा महाले यांची ती ऐतिहासिक गोष्ट आपल्यासमोर आपसुकच येते. त्या काळापासून असं म्हटलं जायचं होता जीवा म्हणून वाचला शिवा कारणही तसच होतं. छत्रपती शिवरायांनी खानाचा वध केला त्याप्रसंगी पाठीमागून हल्ला करणारा खानाचा चलाख अंगरक्षक सय्यद बंडा याला क्षणाचाही विलंब न करता आस्मान दाखवुन यमसदनी पाठविणारे शिवरायांचे अंगरक्षक जीवा महाले यांची होता जीवा म्हणून वाचला शिवा अशी ओळख निर्माण झाली. स्वराज्याची धुरा ज्यांनी तळहातावरील फोडाप्रमाणे जपत स्वतः च्या खांद्यावर घेत वेळप्रसंगी मृत्यूलाही सामोरे गेले. अशा अनेक मावळ्यांच्या कर्तृत्वातुनच शिवरायांनी भुमिपुत्रांचे हिंदवी स्वराज्य उभे केले. त्यापैकी एक वीर योद्धा म्हणजेच शूरवीर जिवाजी महाले होत.

शिवकालीन युगात बालपणापासूनच संकटांचा सामना करण्यासाठी लढाईचे प्रशिक्षण दिले जायचे. जीवा महाले यांना देखील साताऱ्याच्या तालमीत लाल मातीतील कुस्ती, जोर, बैठका, तलवारबाजी, दांडपट्टा याचे प्रशिक्षण मिळाले. लाल मातीत कुस्त्या खेळण्यात जिवाजी तरबेज होते. दांडपट्टा तर असा फिरवायचे की पायाच्या टाचेखाली ठेवलेल्या लिंबाचे, डोळ्याचे पाते लवते ना लवते तोच दोन तुकडे करायचा. उंच उड्या मारण्यात तर तो निष्णात होता, उड्डाणकरीत हवेतच शत्रूच्या शरीराचे दोन तुकडे करायचे. शिवाय त्याची नजर ही अतिशय तीक्ष्ण होती. अशा वीर जिवा महाले यांना विनम्र अभिवादन करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रमा द्वारे ऐतिहासिक चित्तथरारक साहसी खेळांचे प्रात्यक्षिक माणगांवकरांना पाहायला मिळणार आहे.

# जंतापासून मुक्त.. होतील मुले सशक्त १० ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील एक वर्ष ते १९ वर्ष वयोगटातील मुलांना व मुलींना सोमवार, दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजी जंतनाशक गोळ्या नि:शुल्क देण्यात येणार आहेत. या गोळ्या सर्व मुलामुलींना अंगणवाडी व शाळा स्तरावर उपलब्ध असतील. या गोळ्या चावून किंवा लहान मुलांना पाण्यामध्ये विरघळवून देणे आवश्यक आहे, असे जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे यांनी कळविले आहे.

जंतनाशक गोळी खाल्ल्याने रक्तक्षय कमी होतो, बालक आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे शाळेतील उपस्थिती वाढते, मुले क्रियाशील बनतात व मुलांची रोगप्रतिकारशक्ती वाढते, आरोग्य चांगले राहते, अल्बेडझोल च्या एका गोळीमुळे जंताचा नाश होण्यास मदत होते, असे लाभ होतात.

ग्रामीण भागामध्ये एकूण ४ लाख ६० हजार १ ते १९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना या गोळ्या सर्व शाळा व अंगणवाडीच्या ठिकाणी दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याकरिता ४ लाख ७० हजार अल्बेडॅझोल गोळ्या ग्रामीण भागात वितरीत करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण भागातील ३ हजार ४६८ अंगणवाडी केंद्र, ३ हजार ९२ शाळा तसेच ७५८ इतर शैक्षणिक संस्थांमधून झील गोळ्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

तत्पूर्वी जिल्हा कृती दलाची बैठक जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.पाटील यांनी महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांना ही मोहीम यशस्वी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे व जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्री.राजेंद्र भने उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे यांनी तालुका स्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्रावरील या मोहिमेबाबतचे सर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे सांगितले. या मोहिमेत ग्रामीण भागातील एकूण ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच २८० आरोग्य उपकेंद्रे या ठिकाणी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी तसेच ३ हजार ४०० अंगणवाडी सेविका आणि १ हजार ७७५ आशा सेविका सहभाग नोंदविणार आहेत. तसेच शहरी भागामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रूग्णालय यांच्यामार्फतही मोहीम राबविण्यात येणार आहे. ज्या मुलामुलींना कोणत्याही कारणाने दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजी जंतनाशक गोळी दिली नसेल तर त्यांना दि.१७ ऑक्टोबर २०२२ रोजी मॉप-अप राऊंडच्या वेळी गोळी देण्यात येणार आहे. १ वर्ष आतील बालकांना गोळी देण्यात येऊ नये, १ वर्ष ते २ वर्ष वयोगटातील बालकांना अर्धी गोळी देण्यात यावी, अशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोडपाली -तळोजा रस्त्यातील झाडे-झुडपांचा प्रवाशांना नाहक त्रास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरात नव्याने येणाऱ्या प्रवाशांना इच्छितस्थळी पोहोचण्यासाठी तळोजा फाटा या ठिकाणाहून रोडपाली पुलाकडून नावडे, तळोजाकडे रस्ता गेला आहे. या रस्त्याचा अनेकांना उपयोग होतो. मात्र सद्यस्थितीत अनेक महिन्यांपासून रस्त्याकिनारी जंगली झाडे-झुडपे प्रचंड प्रमाणात वाढली आहेत. त्याचा नाहक त्रास येथून जाणाऱ्या प्रवासी, स्थानिक आणि वाहनचालकांना होत आहे. सिडकोकडून लावण्यात आलेला दिशादर्शक फलक याच झाडांआड गेला आहे. पदपथ तर झुडपांमुळे हरवला आहे.

सायन-पनवेल महामार्गावरील खारघरकडून पनवेलकडे जाताना टोल नाका गेल्यावर तळोजा फाटा येथून वळण लागते. येथील रोडपाली तळोजा वसाहत, पुलाखालून एमआयडीसी, नावडे व रोडपाली, कळंबोली येथे जाता येते. याच मार्गावर नवी मुंबई पोलिस मुख्यालय आहे. येथून खासगी वाहनांसह एनएमएमटीच्या बसही धावतात.

मात्र, अनेक महिन्यांपासून तळोजा फाटा रोडपाली रस्त्याकिनारी मोठ्या प्रमाणात जंगली झाडे-झुडपे वाढली आहेत. वळणावर पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी महिलांना येथून जाणे असुरक्षित वाटत असते. येथील पदपथ तर बऱ्यापैकी झुडुपांमुळे हरवला आहे.

यामुळे स्थानिकांना चालताना गैरसोय होत असते. तेथून जाताना सरपटणाऱ्या प्राण्यांची भीतीही त्यांना वाटत आहे. नावडे, तळोजा वसाहत, तळोजा एमआयडीसी आणि कळंबोली वसाहतीची विविध सेक्टरची माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी सिडकोने दिशादर्शक फलक लावले आहे. मात्र हे फलक सध्या झुडपांच्या आड झाकले गेले आहेत. यामुळे प्रवाशांची दिशाभूल होत आहे. सिडकोने फलकालगतच्या झाडांची छाटणी करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.

# वेब सीरिज बघून तिजोरी संरक्षक व्यवस्थापकानेच लुटली बँकेची तिजोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेब सीरिज व चित्रपट बघून डोंबिवलीतील आयसीआयसीआय बँकेच्या तिजोरी संरक्षक व्यवस्थापकाला बँकेची तिजोरी लुटण्याचा मोह झाला. ११ वर्ष एकाच बँकेत काम करत असल्याने बँकेच्या तिजोरीसह सर्व हालचालींची बारकाईने माहिती असलेल्या तिजोरी संरक्षक व्यवस्थापनाने जुलैमध्ये बँकेच्या तिजोरीतील सुमारे १२ कोटीची रक्कम व्यवस्थापकाने मोठ्या चलाखीने सहकार्यांच्या मदतीने लुटून नेली. बँकेच्या तपासणीत हा प्रकार उघड झाल्यानंतर तिजोरी संरक्षक व्यवस्थापक फरार झाला. अनेक महिन्यांच्या अथक प्रयत्नानंतर मानपाडा पोलिसांनी तिजोरी व्यवस्थापकाला पुण्यातून अटक केली.

अल्ताफ शेख (४३) असे तिजोरी संरक्षक व्यवस्थापकाचे नाव आहे. त्याचे या प्रकरणातील सहकारी आरोपी अबरार कुरेशी (३३), अहमद खान (३३), अनुज गिरी (३०) यांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे. या चोरीचा म्होरक्या व्यवस्थापक शेख होता. चार महिन्यांपासून पोलिस त्याच्या मागावर होते. अल्ताफ शेखला पकडण्यासाठी पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांवर, त्यांच्या खर्चावर पाळत ठेवली होती. अल्ताफला दरोडे, चोऱ्या, बँक लुटीच्या घटनांवर आधारित चित्रपट, वेब सिरिज पाहण्याची खूप हौस होती. या सततच्या पाहण्यातून त्याने आपण कार्यरत असलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या डोंबिवली एमआयडीसीतील शाखेतून बँकेला कोणताही संशय येणार नाही अशा पध्दतीने बँकेच्या तिज-ोरीतून रक्कम लुटीची योजना आखण्यास सुरुवात केली. ११ वर्ष अल्ताफ बँकेच्या एमआयडीसीत शाखेत कार्यरत होता. बँकेचे कर्मचारी, अधिकारी, सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही यांच्या हालचाली, येणेजाणे त्याला माहिती होते. बँक तिजोरी लुटण्याचा निर्णय घेतल्यानंतर अल्ताफने त्यानंतर लुटीची रक्कम कोठे ठेवायची. तिजोरी कशी फोडायची. ती रक्कम बँकेतून सीसीटीव्हीला चकवा देऊन कशी बाहेर काढायची अशी योजना वेब सिरिजचा अभ्यास करुन तयार केली. बँकेचा सीसटीव्हीची दिशा बदलून, धोक्याचा इशारा देणारा भोंगा निष्क्रिय करुन एसीच्या एका बाजुला मोठे छिद्र पाडून त्यामधून तिजोरीतील ३४ कोटी रक्कम बाहेर टाकण्याचा निर्णय घेतला. एवढी चोरी करुनही मी या प्रकरणात कोठेही नाही असे दाखविण्याचा अल्ताफचा प्रयत्न होता. दीड महिने बँकेची अंतर्गत पाहणी होणार नसल्याची खात्री पटल्यावर अल्ताफने हळूहळू रक्कम लुटीचा डाव रचला. परंतु बँक अधिकाऱ्यांच्या सीसीटीव्हीचा डीव्हीआर जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. तात्काळ वरिष्ठ आणि बँक पाहणी पथकाला बोलविण्याचा निर्णय बँकेने घेतला. आता आपण या प्रकरणात अडकले जाऊ या भीतीने तत्पूर्वीच तिजोरीतील ३४ कोटीची रक्कम लुटीचा डाव रचला. त्याने एसीच्या छिद्र पाडलेल्या भागातून ३४ कोटीची रक्कम भरुन ठेवली होती. ती रक्कम त्याने बँक इमारतीच्या पाठीमागील बाजूला लोटली. त्यावर ताडपत्री टाकली. या रकमेतील १२ कोटीपैकी अल्ताफने आपल्या मित्रांसह लुटून पळून गेला. लुटीपूर्वी त्याने लुटीचा आराखडा तयार करण्यासाठी तळोजा येथे एक सदनिका बहिणीच्या नावाने खरेदी केली होती. तेथे वेब सिरिज पाहून तो आराखडा तयार करायचा. स्वता जवळील लुटलेली तीन कोटीची रक्कम ठेवण्यासाठी ऐरोलीत एक निर्जन ठिकाण पाहिले. ही पिशवी गर्दुल्ल्यांच्या हाताला लागली. ती त्यांनी मौजमजेवर उधळली. बँकेने तक्रार केल्याने पोलीस तपास सुरू झाला होता. व्यवस्थापक शेख यानेच हा प्रकार केल्याचा पोलिसांना संशय होता. पोलिसांनी राज्याच्या विविध भागात जाऊन त्याचा शोध घेतला. तो पोलिसांना चकवा देत होता. अल्ताफचे कुटुंब मोठे आहे. तो मुंब्रा येथे आई, वडिल, पत्नी, मुलीसह राहत होता. वाढता घर खर्च भागविण्यासाठी त्याने ही शक्कल लढविली. या चोरी प्रकरणात अल्ताफच्या पत्नीने पोलिसांना पूर्ण सहकार्य केले, असे पोलीस तप-ासात उघड झाले. तिजोरीतील रक्कम लुटीपूर्वी तिजोरीचा बारकाईने अभ्यास करुन अल्ताफने ही लूट केली. त्याच्या लॅपटॉपमधून हार्डडिस्क, बँकेच्या आतील दृश्यीकरण ताब्यात घेतले आहे. सदरची कामगिरी अपर पालास आयुक्त दत्त-ात्रेय शिंदे , पोलीस उप आयुक्त सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस स्टेशनचे वपोनि शेखर बागडे, सपोनिरी. सुनिल तारमळे, पोहवा प्रशांत वानखेडे, पोहवा अशोक कोकोडे, पोहवा सुशांत तांबे, पोशि संतोष वायकर, पोशि तारांचंद सोनवने यांचे पथकाने केलेली आहे.

# माथेरान मधील अंगणवाडी मुलांना खाऊचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सर्वांचा आवडता सण दसऱ्याच्या निमित्ताने माथेरान मधील अंगणवाडी शाळ-ेतील मुलांना येथील धनगर समाजाचे युवा कार्यकर्ते प्रवीण बावदाने यांच्या मित्र परिवाराच्या पुढाकाराने खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी धनगर समाज अध्यक्ष दीपेश ढेबे, माजी अध्यक्ष राकेश कोकळे, गोविंद बावदाने, प्रवीण बावदाने, करण जानकर, अंकुश कोकरे, निलेश ढेबे, भावेश झोरे, यशोमती जानकर, सुवर्णा बावदाने, अंगणवाडी सेविका रमा आखाडे, स्मिता गायकवाड, मनीषा शिंदे, शबाना महापुळे आदी उपस्थित होते.

दरवर्षी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर अहिल्याबाई होळकर चौकात धनगर समाज एकत्रित येऊन पुढे श्री पिसरनाथ मंदिरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.



यावेळी धनगर समाजाच्या प्रवीण बावदाने मित्र परिवार यांच्या पुढाकाराने या शुभप्रसंगी अंगणवाडी मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी राकेश कोकळे यांनी आपले विचार व्यक्त करताना स्पष्ट केले की ज्या ज्या वेळी अंगणवाडी शाळेतील मुलांना काही वस्तूंची आवश्यकता भासल्यास आमच्या या मित्र परिवार मार्फत नक्कीच मदत केली जाईल. तर हा एक स्तुत्य उपक्रम प्रवीण बावदाने मित्र परिवार मार्फत राबविण्यात आला असून अशाचप्रकारे गावातील सक्षम नागरिकांनी पुढाकार घेऊन अंगणवाडी शाळेतील मुलांना सढळ हस्ते मदत केल्यास मुलांसाठी एक चांगली मदत प्राप्त होऊ शकते. शालेय जीवनातील अंगणवाडी हा एक पाया आहे हाच पाया मजबूत करण्यासाठी या मित्र परिवार प्रमाणे स्वयंसिद्ध लोकांनी स्वेच्छेने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

# इनरव्हील क्लब कर्जतच्या वतीने अंगणवाड्यांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

इनरव्हील क्लब कर्जतच्या वतीने कर्जत तालुक्यातील दोन अंगणवाड्यांना मदतीचा हात दिला आहे.

कर्जत तालुक्यातील माळवाडी व किरवली येथील चार अंगणवाड्यांना इनरव्हील क्लब ऑफ कर्जत च्यावतीने फर्निचर व शालेय वस्तू आणि खाऊचे वाटप करण्यात आले आहे, प्रत्येक अंगणवाडीत २५ ते ३० मुले आहेत. इनरव्हील क्लबच्या सेक्रेटरी मोनिका बडेकर यांनी ५० हजार रुपये पेक्षा अधिक रकमेचे साहित्य या अंगणवाड्यांना देणगी स्वरूपात दिले आहेत.

याप्रसंगी क्लबच्या अध्यक्ष उत्तरा वैद्य, सेक्रेटरी मोनिका बडेकर, आय एस ओ प्राची चौडीए, मधुरा मुळे, साक्षी अडसूळे आदी सदस्या उपस्थित होत्या.

# को.म.सा.प.शाखा तळा व द.ग.तटकरे महाविद्यालयातर्फे सुत्रसंचालन कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा व द.ग.तटकरे महाविद्यालय तळे यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ७ आक्टोबर २०२२ रोजी द.ग.तटकरे महाविद्यालय तळे येथे सूत्रसंचालन कार्यशाळा अतिशय उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी को.म.सा.प.तळा शाखा अध्यक्ष, निवेदक हेमंत बारटक्के व विख्यात नाट्यअभिनेते, सुत्रसंचालक, नाट्यदिग्दर्शक, कवी प्रणय इंगळे हे उपस्थित होते.कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त शिर्के गुरुजी, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, प्र.प्राचार्य भगवान लोखंडे, गो.म.वेदक इंजिनियरिंग कालेजचे प्रोफेसर जतिश भगत, को.म.सा.प.तळा शाखा युवाशक्ती प्रतिनिधी श्रेयश रोडे सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष, संस्थेचे उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे हे होते. प्रास्ताविकात प्रा.नानासाहेब यादव यांनी कार्यशाळेची आवश्यकता विषद केली. को.म.सा.प.तळा शाखा संस्थापक पुरुषोत्तम मुळे यांनी भाषणात सूत्रसंचालन हि एक कला असून महाविद्यालयाच्या नवतरुणांनी हि कला विकसित करण्यासाठी आवश्यक गुण आजच्या या कार्यशाळेतून आत्मसात करुन स्वतःला समृद्ध करावे असे सांगितले सुव यापुढे महाविद्यालयात वर्षभरात को.म.सा.प.च्या सहकार्याने चार साहित्यिक कार्यक्रम करण्याची घोषणा केली. संस्थेचे सचिव मंगेश देशमुख व विश्वस्त शिर्के यांनीही मनोगत व्यक्त केले.को.म.सा.प.तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी सुत्रसंचालन हे जसे उपजत असते तसेच आवड असेल तर ते कठोर परिश्रम व अभ्यासाने विकसित करता येते असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे निम्मे यश हे सूत्रसंचालकाच्या सादरीकरणावर असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच सूत्रसंचालन प्रभावी होण्यासाठी सभाधीटपणा, चांगला आवाज, प्रभावी शब्दफेक, शब्दसंपत्ती, हजरजबाबीपणा, वेळेचे भान, श्रोत्यांची जाण, भाषाशैली या मुद्द्यांवर सविस्तर सोदाहरण विश्-लेषण केले. प्रत्येकाने स्वतःची स्वतंत्र निवेदनाची शैली विकसित करावी असे प्रतिपादन करुन मार्गदर्शन केले. प्रा.प्रणय इंगळे यांनी मार्गदर्शन करताना प्रत्यक्ष कार्यक्रमात उद्घाटन, दिपप्रज्वलन, प्रास्ताविकापासून ते आभारप्रदर्शनापर्यंत कशाप्रकारे प्रभावी सुत्रसंचालन करायचे असते याचा नमुना सादर केला. कार्यक्रमात समसुचकपणे निवेदकाने प्रत्येक छोट्या गोष्टींवर सुक्ष्मपणे निरीक्षण करुन जागरुक असले पाहिजे व कार्यक्रम यशस्वी करण्यात कशी मोलाची भुमिका बजावता येईल याचे दिशादर्शन केले. त्यांनी हास्यविनोदातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करुन निवेदनाचे धडे दिले.

# मुरुडमध्ये नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर

## मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यासाठी युवकांना आवाहन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हाधिकारी तथा नियंत्रक नागरी संरक्षण - रायगड व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड मध्ये दि.१० ते दि.१४ ऑक्टोबर या कालावधीत मोफत नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या प्रशिक्षणाचे उदघाटन तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

नागरी संरक्षण ही देशातील सामान्यलोकांची संघटना आणि प्रशिक्षण आहे जेणे करून सशस्त्र दल, वैद्यकीय सेवा किंवा पोलिस दलाला मदत करू शकतील, देशावर शत्रूने हल्ला केल्यास.नागरी संरक्षण उपाय तात्काळ आणीबाणीच्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी, जनतेचे संरक्षण करण्यासाठी आणि आपत्ती मुळे नष्ट झालेल्या किंवा नुकसान झालेल्या महत्त्वपूर्ण सेवाआणि सुविधा पुनर्संचयित करण्यासाठी डिझाइन केले आहे.२४ ऑक्टोबर १९४१ रोजी भारतात सर्वप्रथम नागरी संरक्षणाची स्थापना करण्यात आली. संसदेने मे १९६८ रोजी नागरी संरक्षण कायदा २७,१९६८ म्हणून लागू केला. नागरी संरक्षणाची उद्दिष्टे, जीव वाचवण्यासाठी, मालमत्तेचे नुकसान कमी करण्यासाठी, उत्पादनात सातत्य राखण्यासाठी, जनतेचे उच्च मनोबल राखणे, नागरी संरक्षणाच्या सेवा नागरी संरक्षणात १२ सेवा आहेत.यात मुख्यालय सेवा, संप्रेषण सेवा,वॉर्डन सेवा,अपघाती सेवा,अग्निशमन सेवा,प्रशिक्षण सेवा, बचाव सेवा,डेपो आणि वाहतूक सेवा, पुरवठा सेवा,बचाव सेवा यांचा यात समावेश आहे.

मुरुड तालुक्यातील १८ वर्षे वयावरील युवक व युवतींनी या प्रशिक्षण शिबिरात मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे. असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहिती व नाव नोंदणी साठी तुफैल दामाद मोबाईल नंबर ९२७०५१२८५८ या नंबरवर संपर्क साधावा.असे कळविण्यात आले आहे.


## तुलसी हाईटस को.ऑप.हौ.सोसायटी लि.

प्लॉट नं.२५, सेक्टर २२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९

### जाहीर नोटीस

मे.तुलसी हाईटस सहकारी गृहनिर्माण संस्था, पत्ता : प्लॉट नं.२५, सेक्टर-२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९ या संस्थेच्या इमारतीचा विमा काढण्यात येणार आहे.

तरी संबंधित विमा कंपन्यांनी वरील पत्यावर आपले कोटेशन पुढील १५ दिवसांमध्ये आणून द्यावे.

**संपर्क :- ९५६१९९७८८०**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल, किरण अशोक अनभुले रा.रुम नं.ई १७, श्री.ज्ञानेश्वर माऊली को.ऑप.हौ.सोसायटी लि. विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीच्या खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे जुने दस्त दि.२०/१२/२०११ रोजीचे नोंदणीकृत अभिहस्तांतरपत्र करार (पवल १. दस्त नं.१६०७६/२०११) ची मुळप्रत आमच्या अशिलांकडून गहाळ झालेली आहे. त्याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस स्टेशन, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे लॉस्ट प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन नं.१८९०/२०२२ दिनांक २२/०९/२०२२ प्रमाणे तक्रार नोंदविलेली आहे. तरी सदर गहाळ झालेल्या दस्ताची मुळ प्रत कोणालाही सापडली असल्यास ती आमच्या खालील कार्यालयाच्या पत्यावर ७ दिवसांच्या आत आणून द्यावी अथवा त्याबाबत कळवावे.

**परिशिष्ट**

**सदनिका क्र.ई १७, पहिला मजला, ई विंग, श्री.ज्ञानेश्वर माऊली को.ऑप.हौ.सोसायटी लि., गट नं.८०, हिस्सा नं.२, प्लॉट क्र.०१, विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ५१० चौ.फुट कारपेट**

पनवेल
दि.०७/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.निलम किसन शिंदे**
**२, आशादीप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल मौजे : मालडुंगे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्रीमती.शोभा सुरेश मुंगे आणि श्री.प्रसाद विश्वास आचरेकर यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**
**मौजे : मालडुंगे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मालडुंगे | ८२/२/अ/१ | २-८४-८० पो.ख. ०-४३-७० एकूण ३-२८-५० पैकी ०-३०-०० क्षेत्रफळाकरिता | ४.५१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.०८/१०/२०२२
पनवेल

**सही/-**
**ॲड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल, रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**

मा.गुन्नाल साहेब
ये.का.मु.२.००.०००-२००८-पीए ४-(जे)२७०
शा.नि.न्या.वि.क्र.११७९, दि.१२-२-१२
वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा

ॲड.अनिल रा.नागदेवे
ॲड.संजय के. कानडे
दिवाणी अ १५० म.
Civ. A. 150 m.

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३६८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.६/१२/२०२२

ज्यापेक्षा श्री.सुरेश विठ्ठल भस्मा (मयत) रा.मु.धामणी, पो. वाजे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.१४/०७/२०२२ रोजी, धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आणि अर्जदार १) श्रीमती.कल्पना विठ्ठल भस्मा, २) श्री.सुरेश विठ्ठल भस्मा, ३) श्री.विलेश विठ्ठल भस्मा, अनु क्र.१ ते ३ रा.मु.धामणी, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड ४) सौ.संध्या विठ्ठल भस्मा उर्फ संध्या नितीन पादिर रा.मु.नालधेवाडी, पो.सुगवे, ता.कर्जत, जि.रायगड यांनी ह्या कोर्टास सदरहू मयत कै.विठ्ठल बाळू भस्मा यांचे नावे मिळकत नाही. कै.विठ्ठल बाळु भस्मा हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पनवेल शहर विभागांतर्गत भांडार कक्ष येथे मुख्य तंत्रज्ञ या पदावर नोकरीस होते. महावितरण कंपनी पनवेल शहर विभागातर्फे कार्यकारी अभियंता यांनी दि.२२/०८/२०२२ रोजी अर्जदार क्र.१ च्या नावे पत्र दिलेले असून कुटुंब सेवानिवृत्त प्रकरणाची पुर्तता करणेकामी वारस दाखला लवकरात लवकर दाखल करावा असे सांगितलेले आहे. सबब अर्जदार यांस वारसदाखल्याची गरज असल्याने सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.विठ्ठल बाळु भस्माचे वारसचे सर्टीफिकेट देईल.

दि.७ माहे १० सन २०२२

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक (प्रशासन)**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात

क्र.कुळ कायदा कलम ७० ब केस क्र.११/२०१९

प्रति,
१) श्री.लडकू गोविंद वाघे
रा.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.कमलेश सदाशिव सुर्वे
रा.मोर्बे द्वारका वसाहत, ता.पनवेल, जि.रायगड
२) राजेश्री रमेशचंद्र जोशी
३) दिपक रमेशचंद्र जोशी
४) दिनेश रमेशचंद्र जोशी
५) दिलीप रमेशचंद्र जोशी
रा.मुलुंड, मुंबई — सामनेवाले

सामनेवाले क्र.२ ते ५ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद केलेल्या प्रश्नाधीन मिळकतीबाबत अर्जदार यांनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये कुळ निश्चित करून मिळणेबाबत दि.२३/१२/२०१९ रोजी दावा दाखल केलेला आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणामधील अर्जदार यांचे वकीलांनी मा.न्यायाधिकरणाचे निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत दावा मिळकतीसंदर्भात यापूर्वी कुळ कायदा कलम ७० ब अन्वये केस क्र.५/२००७ प्रकरण चालविण्यात आलेले होते. त्यामध्ये अंतिम निर्णय पारित झालेला नाही. यास्तव, यापूर्वीचे कुळ कायदा कलम ७० ब केस क्र.५/२००७ प्रकरण या नवीन प्रकरण १९/२०१९ मध्ये सामील करून एकत्रितरित्या चालवून सुनावणी घेण्यात आलेली आहे. तदनंतर प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेलया आहेत. मात्र प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाले क्र.२ ते ५ हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पुढील सुनावणी निम्नस्वाक्षरीतांच्यासमोर दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल यांचे कार्यालय, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब, या जाहीर नोटसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे मोर्बे, ता.पनवेल | १५१/२ | ०.४१.२० | १.०० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३०/०९/२०२२

**सही/-**
**तहसीलदार पनवेल**

# संक्षिप्त...

## कळंबोलीतून विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथून आपल्या राहत्या घरातुन एक विवाहित महिला कोणास काही एक न सांगता घरातुन निघुन गेल्याने या बाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.



राजश्री लखन पवार (वय २२ वर्षे) असे या बेपत्ता विवाहित महिलेचे नाव असून ती आपल्या एलआयजी-२, रुम नं.सी/७ भारत गॅस जवळ, सेक्टर १, कळंबोली, पनवेल येथील आपल्या राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता घरातुन निघुन गेली आहे. सदर महिलेची उंची अंदाजे ४ फुट ४ इंच, डोळे काळे, रंग सावळा अंगाने मजबूत, चेहरा गोल, केस काळे व मोकळे सोडलेले, नाक सरल, अंगामध्ये पंजाबी टॉप आणि काळया रंगाची लेगीज, डाव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीत लखन नाम आहे. सदर महिलेला मराठी व हिन्दी भाषा बोलता येत असून या महिलेबाबत कोणास काही माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोना किशोर म्हात्रे ९०८२०२५७६६ यांच्याशी संपर्क साधावा.

## गटाराच्या खड्ड्यात अडकलेल्या गाईला काढले बाहेर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नेरे, महालक्ष्मीनगर येथील गटारामध्ये अडकलेल्या गाईला सुखरूपपणे बाहेर काढण्यात आले आहे.

नेरे, महालक्ष्मी नगर येथील गटाराच्या खड्ड्यात गाय अडकली होती. खड्ड्यातून गाईला बाहेर पडता येत नव्हते. यावेळी सुनील वानखेडे व क्रांतिकारी बिट्स मधील वादक कलाकार नेरे येथील देवी विसर्जन करण्यासाठी वाजवायला गेले होते.

त्यांना तिथे गाय गतरातील खड्यामध्ये अडकलेली दिसली. त्या वेळेस सुनिल वानखेडे, शुभम सातपुते ,सुशांत कांबळे , मिहीर कांबळे, तेजस कांबळे, अनिकेत हिरवे, यश महाजन, आर्यन साळुंके, रोहन राजापकर, या सर्व मुलांनी गाईला बाहेर काढण्याचा निर्णय घेतला व खड्डुया बाजूची जागा साफ करून गाईला सुखरूपपणे बाहेर काढले आणि तिचे प्राण वाचवले. यावेळी नवीन पनवेल अग्निशामक दलाला देखील पाचारण करण्यात आले होते.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# राज्यातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शैक्षिणक, सामाजिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत 'दुर्ग' अंकाने तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत 'साहित्य आभा' य दिवाळी अंक प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे मानकरी ठरले, असल्याची माहिती श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (शुक्रवार, दि. ०७ ऑक्टोबर) येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. तर या दिवाळी अंक स्पर्धे पासून बक्षिसांच्या रक्कमेत वाढ केली असल्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केले. त्यामुळे राज्यस्तरीय स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ७५ हजारावरून ०१ लाख रुपये, तर जिल्हास्तरीय स्पर्धेत ३० हजारांचे बक्षिस ४० हजार रुपये करण्यात आले आहे. तसेच इतर पारितोषिकांच्या रक्कमेतही वाढ करण्यात आली असून राज्यातील



सर्वात मोठ्या या दिवाळी अंक स्पर्धे ने साहित्यिक, लेखक, कवी, वाचक आणि दिवाळी अंकांचा सन्मान अधिक वृद्धिंगत केला आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धेचे संयोजक दीपक म्हात्रे आदी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले कि, सन २०२१ च्या अर्थात २१ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धे त नाशिक येथील अंकुर काळे यांच्या 'दुर्ग' अंकाने प्रथम क्रमांक पटकाविला. पुणे येथील डॉ. वंदना बोकील- कुलकर्णी यांच्या 'संवाद सेतू' आणि पुणे येथील हेमंत पोतदार यांच्या 'व्यासपीठ' अंकाने द्वितीय (विभागून), तृतीय क्रमांक(विभागून) जळगाव येथील नामदेव कोळी यांच्या 'वाघूर' आणि सोलापूर येथील इंद्रजित घुले यांच्या 'शब्दविचार' अंकाने मिळविले. तसेच उत्कृष्ट कथेचे बक्षिस 'अक्षरधारा' अंकातील 'देव करो' या कथेने, उत्कृष्ट कविता 'शब्दरूची' दिवाळी अंकातील सदानंद डबीर यांनी, उत्कृष्ट व्यंगचित्र गजानन घोंगडे यांनी, उत्कृष्ट विशेषांक दिनकर शिलेदार यांच्या ' मी' अंकाने तर उत्कृष्ट मुखपृष्ठाचे बक्षिस रामनाथ आंबेरकर यांच्या ' किल्ला' या अंकाने पटकाविला आहे. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून प्रतिभा सराफ, रविप्रकाश कुलकर्णी, अरविंद दोंदे, श्रीकांत नाईक या साहित्यिक मंडळींनी काम पहिले.

रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत शारदा धुळप यांच्या 'साहित्यआभा' अंकाने प्रथम क्रमांकाचा मान मिळविला आहे. द्रितीय क्रमांक प्रमोद वालेकर यांच्या 'दैनिक किल्ले रायगड' अंकाने, तृतीय क्रमांक शुभदा पोटले यांच्या 'म्हसळा टाइम्स' अंकाने तर उत्तेजनार्थ बक्षिस रत्नाकर पाटील यांच्या श्री समर्थ विचार आणि नाना करंजुले यांच्या कर्तृत्व अंकाने पटकाविले आहे.

राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस ०१ लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार तर ततीय क्रमाकांस ३० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कष्ट कथेसाठी ०७ हजार रूपये, उत्कष्ट कविता, उत्कष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट विशेषांक व उत्कृष्ठ मुखपृष्ठ यांना प्रत्येकी ०५ हजार रुपये, तसेच रायगड जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकास ४० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रूपये आणि ततीय क्रमाकांस १० हजार रूपये, दोन उत्त-ेजनार्थ प्रत्येकी ०५ हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप असून दिपावलीनंतर आयोजित करण्यात येणाऱ्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने गेल्या २१ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते आणि या स्पर्धेला राज्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो. कितीही संकटे आली तरी दिवाळी अंकांच्या १११ वर्षांच्या परंपरेत खंड पडलेला नाही. वाचकांची संख्या घटत आहे, अशी ओरड दरवर्षी होते, मात्र तसे न होता दर्जेदार साहित्यामुळे दिवाळी अंकांना मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हि अंक निर्माते, साहित्य दर्दी वाचकांसाठी सुखावह बाब असून हि साहित्य परंपरा अखंडित ठेवण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आश्वासित केले.

## अपघात विमा देण्याच्या बहाण्याने महिलेची १ लाख ४७ हजार रुपयांनी फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन लाख रुपयांचा अप-घात विमा देण्याच्या बहाण्याने एका महिलेने उलवे येथे राहणाऱ्या व्यक्तीकडून त्याच्या क्रेडिट कार्डची माहिती घेऊन त्याच्या खात्यातून १ लाख ४७ हजार रुपयांची रक्कम परस्पर काढून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एनआरआय पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात महिलेविरोधात आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

तक्रारदार भावना देवान (४२) हा उलवे सेक्टर ८ मध्ये राहण्यास असून तो सीवूड्समधील एका शाळेत कार्यरत आहे. जानेवारीमध्ये त्याने एसबीआय बँकेतून क्रेडिट कार्ड घेतले होते. त्यानंतर मार्चमध्ये सायबर गुन्हेगारांच्या टोळीतील एका महिलेने देवान यांना संपर्क साधला होता. तसेच त्यांच्या क्रेडिट कार्डवर २ लाख रुपयांचा अपघात विमा असल्याचे व त्यासाठी प्रति महिना २ हजार रुपये प्रमाणे चार्ज आकरले जाणार असल्याचे सांगितले. सद-रचा प्लान चालू ठेवायचा की बंद करायचा अशी विचारणा समोरील महिलेने केल्यानंतर देवान यांनी प्लान बंद करण्यास सांगितले. त्यानंतर महिलेने अपघात विमाचा प्लान बंद करण्याच्या बहाण्याने देवानकडून क्रेडिट कार्डची संपूर्ण माहिती घेतली.

त्यानंतर त्याच्या कार्डमधून तीन व्यवहाराद्वारे १ लाख ४७ हजार रुपये काढून घेतले. याबाबतचे मेसेज देवान याच्या मोबाईलवर आल्यानंतर त्याने तत्काळ बँकेत धाव घेऊन क्रेडिट कार्ड बंद करून घेतले. त्यानंतर नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे तक्रार दाखल केली. अखेर एनआरआय पोलिसांनी गत आहे. आठवड्यात अज्ञात महिलेविरोधात आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली.

## एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींकरिता पनवेल येथे कायदेविषयक मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेन-ुसार एआरटी केंद्र लोधिवली, खालापूर येथे तालुका विधी सेवा प्राधिकरण, खालापूर यांच्या सहकार्याने दि.२८ सप्टेंबर २०२२ रोजी कायदेविषयक मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यक्रमास रिलायन्स हॉस्पिटल, लोधीवलीचे संचालक डॉ.रणजित खंदारे, डापकुचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.संजय माने हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.संजय माने यांनी रायगड जिल्ह्यामधील एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणाऱ्या शासकीय सेवा सुविधांबाबत सविस्तर माहिती देऊन एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवा सवलती सहज मिळाव्यात याकरिता संजय गांधी निराधार योजना, जिल्हाधिकारी कार्यालयात एक खिडकी योजना सुरु करून शासकीय सेवा देण्यात येणार असून याकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांची मदत घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी एआरटी केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.पर्णा बार्डोलोई यांनी एआरटीविषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमास खालापूर न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश ड.आर.डी.वाबळे व सह दिवाणी न्यायाधीश श्री.पी.एम.माने हे हजर होते. त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात एचआयव्ही सह जगणारा व्यक्ती व कायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. रायगडमधील प्रत्येक तालुक्यातील न्यायालयामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय असल्याची माहिती दिली. संबंधित तालुक्यातील महिलांनी तेथील विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामध्ये जाऊन कायदेविषयक मदत घेण्याबाबत आवाहन यावेळी करण्यात आले.

एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे-पनवेल मधील एआरटी केंद्राचे संचालक डॉ.सुधीर कदम यांनी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे हे सन १९९८ पासून एचआयव्ही प्रतिबंधाकरिता कार्य करीत असून आता एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना रुग्णालयातच एआरटी केंद्र सुरु करून एआरटी उपचार देत असल्याचे सांगितले.

प्रभारी जिल्हा न्यायाधीश तथा पन-वेल सह दिवाणी न्यायाधीश जे.डी.वाडने यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणामध्ये सन २०१७ च्या कायद्याबाबत तसेच एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना असणाऱ्या हक्क व अधिकारांबाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. संजय माने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डापकु जिल्हा सहाय्यक लेखा श्री.रवींद्र कदम, एआरटी केंद्र लोधिवली, खालापूरच्या समुपदेशक श्रीमती तारा इंगळे, एआरटी केंद्र लोधिवली, एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे-पनवेल येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

## महाड बाजारपेठेत स्वच्छतागृह नसल्याने नागरिकांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड ही शिवकालीन बाजारपेठ असून महाड, पोलादपूर, माणगांव, मंडणगड तालुक्यातील ग्राहक खरेदी व शासकिय कामा निमित्त महाड शहरात येत असतो. शिवकालीन श्री विरेश्वर मंदीर, ऐतिहासिक चवदार तळे यांना भेट देणार्या पर्यटकांची संख्याही जास्त असते. महाड बाजारपेठेत मच्छी मार्केट, जुनी मंडई, डोंगरी गल्ली येथे स्वच्छतागृह नसल्याने मोठ्या संखेने शहरात दाखल होणार्या नागरिकांची मोठी गैरसोय होत असते. विशेष करून महिला वर्गाची स्वच्छतागृह नसल्याने कुचंबना होत आहे. अशा अवस्थेत आडोशाला जाऊन उघड्यावर केल्या जाणार्या लघुशंकेमुळे दुर्गंधी व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. महाड नगर परिषद प्रशासनाने शहरातील सुकट गल्ली, डोंगरी गल्ली, जुनी मंडई या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह बांधावेत अशी मागणी केली जात आहे.

महाड शहरात सुकट गल्ली येथे बांधलेल्या शौचालयाची जुलै २०२१ च्या महापूरात दुरा-वस्था झाली असल्याने या परिसरात खरेदी साठी येणारे नागरीक उघड्यावर लघुशंका करीत असल्याने साथीचे रोग पसरण्याची शक्यता आहे. डोंगरी गल्लीत असलेल्या स्वच्छतागृहांचीही दुरावस्था झाली असून या स्वच्छतागृहांची साफ सफाई होत नसल्याने दुर्गंधीयुक्त जागेत जाण्यास नागरीक धजावत नाहीत. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. दरवर्षी श्री विरेश्वर महाराजांच्या छबिना उत्सवासाठी होणारी गर्दी पाहता शहरात चौका चौकात सार्वजनिक स्वच्छता गृह बांधून जनतेची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी महाडकरांच्या वतीने मुख्याधिकारी यांना निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.



## ग्रुप ग्रामपचायत वावंजेच्या उपसरपंचपदी शेकापच्या आनंदी कातकरी

### वेळेआधी राजीनामे देणाऱ्या शेकाप कार्यकर्त्यांचा अभिमान वाटतो : सरपंच डी बी म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रुप ग्रामपचायत वावंजे च्या उपसरपंचपदी गुरुवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी आनंदी सुदाम कातकरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच धनाजी बाळाराम म्हात्रे उर्फ डी. बी.म्हात्रे यांनी त्यांना यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

मावळते सरपंच जीनेश मापा पाटील यांचा कार्यकाल संपल्या नंतर रिक्त असलेल्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीची प्रक्रिया गुरुवारी संपन्न झाली. ग्रामविकास अधिकारी नरेश म्हात्रे यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले.आनंदी सुदाम कातकरी यांचा एकमेव वैध अर्ज प्राप्त झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड होत असल्याची घोषणा त्यांनी केली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सरपंच डी बी म्हात्रे म्हणाले की, आमदार बाळाराम पाटील आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी आम्हाला घालून दिलेल्या पक्ष शिस्तीची शिकवणी प्रत्येक कार्यकर्ता अनुसरत असतो.



त्यानुसार कार्यकाल पूर्ण व्हायच्या अगोदरच जे जे कार्यकर्ते राजीनामे सादर करतात त्यांचा मला सार्थ अभिमान वाटतो. जिनेश यांनी सुद्धा कार्यकाल पूर्ण व्हायच्या अगोदर राजीनामा दिलेला आहे. पक्षातील कार्यकर्त्यांना पदसिद्धतेचा अनुभव यावा या उदात्त हेतूने घालून दिलेल्या पायांड्यामुळे अनेक कार्यकर्ते सक्रिय राजकारणात यशस्वी होत आहेत.

जीनेश पाटील आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की माझा कार्यकाल अत्यंत अनुभव संपन्न असा होता. गणेश घाटावरती पत्र्यांचे अच्छादन बसविणे,ज्ञानदेव पवार यांचे घर ते मापा पाटील यांचे घर हा रस्ता काँक्रिटीकरण करणे यासह अनेक विकास कामांना माझ्या कार्यकाळात गती देता आली याचे समाधान आहे. नवनिर्वाचित उपसरपंचांना माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा.

यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच आनंदी सुदाम कातकरी यांचे अभिनंदन करण्यासाठी सरपंच डी बी म्हात्रे, मावळते सरपंच दिनेश मापा म्हात्रे, ग्रामविकास अधिकारी नरेश म्हात्रे, सदस्य पूनम देविदास धोंगडे, प्रमिला ज्ञानेश्वर चोरमेकर, अरुण पदू कातकरी, कांचन विकास पाटील, देवचंद दत्तात्रय पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे वावांजे विभागीय चिटणीस मच्छिंद्र पाटील आदी मान्यवरांच्या सह कार्यकर्ते, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## मुल्यांकन ठराव दोन दिवसांत न दिल्यास नितेश पाटील यांचा आत्मदहनाचा इशारा

### मुरुड तालुका पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनाच्या विविध योजनांमधून मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील आदाड मध्ये बांधण्यात आलेल्या सभागृहाचा मुल्यांकन ठराव दोन दिवसांत न दिल्यास सामाजिक कार्यकर्ते नितेश पाटील यांनी ग्रामपंचायत कार्यालयात आत्मदहनाचा इशारा देण्यात आला असून याबाबतचे एक निवेदन आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुड तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी यांना देण्यात आले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, विविध विकास कामांत उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील गावे तसेच आदाड गावातील विकास कामांना मंजुरी देण्यात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, सरपंच मनीष नांदगावकर, उपसरपंच महेश पाटील यांच्याकडून होणा-या गलिच्छ राजकारणामुळे आदाड मध्ये बांधण्यात आलेल्या सभागृहाचा मुल्यांकन ठराव देण्यास नकार देण्यात आल्याने विकास कामांना खीळ बसली आहे. येत्या दोन दिवसांत आदाड मधील सभागृहाचे मुल्यांकन ठराव दोन दिवसांत न दिल्यास प्रशासन व ग्रामपंचायत च्या कारभाराला कंटाळून ग्रामपंचायत कार्यालयात आत्मदहनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते नितेश पाटील यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात दिला असून सदर निवेदनाच्या प्रती मुरुड तह-सीलदार यांना देण्यात आलेल्या आहेत.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते नितेश पाटील,महेश गुंड, नथूराम पाटील,प्रभाकर पाटील, अविनाश शिंदे, दिपेश वरणकर उपस्थित होते. याबाबत आमच्या प्रतिनिधीने मुरुड तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी यांच्याशी संपर्क साधला असता,आदाड मधील सभागृहाच्या कामाबाबत रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना अहवाल सादर केला आहे. त्यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल तसेच उसरोली ग्रामपंचायत सरपंच यांजकडून आदाड सभागृहाचा मुल्यांकन ठराव मिळणे बाबत दोन पत्रे देण्यात आली असल्याचे सांगितले.

## अभिनव ज्ञान मंदिर महाविद्यालयातील विद्यार्थीनींचे सुयश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ आणि के.एम.सी महाविद्यालय खोपोली आयोजित आंतरमहाविद्यालयीन (कोकण विभाग) कुस्ती स्पर्धा नुकतीच के.एम.सी. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खोपोली, रायगड येथे संपन्न झाली या स्पर्धेचे संचालक डॉ मोहन आमृळे (शारिरिक शिक्षण व क्रीडा विभाग) मुंबई विद्यापीठ व डॉ. जयवंत माने ( संचालक शारिरिक शिक्षण व क्रीडा विभाग) के.एम.सी. कॉलेज, खोपोली यांनी स्पर्धेचे नियोजन केले होते.या स्पर्धेत सहभागी स्पर्धक पुरुष व महिलास्पर्धक सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन के.एम.सी. कला, विज्ञान व वाणिज्य चे क्रीडा विभाग प्रमुख डॉ.जयवंत माने व तसेच क्रीडा विभाग मुंबई विद्यापीठ येथून आलेले पंच यांच्या हस्ते प्रथमता विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.जयवंत माने यांनी केले, तसेच त्यांनी स्पर्धेची रूपरेषा प्रास्ताविकेत नमूद केली, स्पर्धकांना अनमोल असे मार्गदर्शन केले आणि त्यानंतर स्पर्धा सुरू झाल्या प्रथम महिलागट व पुरुषगट अशा प्रकारे स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत अभिनव ज्ञान मंदिर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कर्जत येथील महिला गटातून ५० कि. या गटातून कु. भुमिका किरण खंडागळे या स्पर्धकाला कांस्य पदक व प्रमाणपत्र डॉ.जयवंत माने यांच्याकडून प्रदान करण्यात आले. या विद्यार्थीनीस मार्गदर्शन करणारे अभिनव ज्ञानमंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कर्जतचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. गणेश पाटील व सहकारी प्रा. मंदार लेले, प्रा. प्रशांत दळवी, प्रा. अंजली शर्मा या सर्वांनी मोलाची भूमिका पार पडली.अभिनव मंदिर संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य आणि सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रवीण घोडविंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

